वाचले :-

१) माहितीचा अधिकार अधिनियम २००५, कलम ५ (१)

२) आदेश क्र.नासुके/१/कावि/७०५/२०१३ दि.०६/११/२०१३

३) आदेश क्र.नासुके/१/कावि/५८८/२०१२ दि.२५/०९/२०१२

४) करआकारणी व करसंकलन विभागाकडील दि.०६/१०/२०१७ रोजीचा कार्यालयीन प्रस्ताव

५) मा.आयुक्त सो यांचेकडील दि.१७/१०/२०१७ रोजीचा मान्य प्रस्ताव

---

ISO 9001 : 2008 Certification
प्राप्त महानगरपालिका

माहितीचा अधिकार

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.
नागरी सुविधा केंद्र,
क्र.नासुकें/१/कावि/ ५०२ /२०१७
दिनांक : ०६ /१२/२०१७

**विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम, २००५**
**जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी पदनिर्देशित करणेबाबत...**
**(करआकरणी व करसंकलन विभाग)**

**आदेश**

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ५ (१) व १९ (१) मधील तरतूदीनुसार वाचले क्र.२ च्या आदेशान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका या सार्वजनिक प्राधिकरणाच्या विविध विभागांसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी पदनिर्देशित करण्यात आलेले आहेत. तसेच, वाचले क्र.३ अन्वये **करआकरणी व करसंकलन विभागासाठी सहाय्यक मंडलाधिकारी तसेच मुख्य कार्यालयात प्रशासन अधिकारी यांना जनमाहिती अधिकारी म्हणून व सह आयुक्त यांना प्रथम अपिलीय अधिकारी** म्हणून पदनिर्देशित करणेत आले आहे.

करआकरणी व करसंकलन विभागाकडील वाचले क्र.४ च्या कार्यालयीन प्रस्तावान्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांचे कार्यालय महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत असल्याने नागरीकांना प्रथम अपिलाच्या सुनावणीकामी हजर राहणेसाठी मुख्य प्रशासकीय इमारतीत यावे लागते व त्यामुळे नागरीकांची गैरसोय होते तसेच वेळेचा अपव्यय होत असल्याचे कळविले आहे. माहिती अधिकारांतर्गत प्राप्त होणारे प्रथम अपिल निकाली काढण्यास विलंब होऊ नये व येणाऱ्या अपिल अर्जांवर जलद गतीने कार्यवाही होणेचे दृष्टीने, अपिलार्थींना त्या-त्या विभागीय कार्यालयात प्रथम अपिल अर्ज सादर करणे व सुनावणीस हजर राहणे सोयीचे व्हावे तसेच, प्रथम अपिल लवकरात लवकर निकाली काढण्याच्या दृष्टीने संबंधित करसंकलन विभागीय कार्यालयाचे प्रशासन अधिकारी यांना प्रथम अपिलीय अधिकारी व करसंकलन मुख्य कार्यालयासाठी सह. आयुक्त यांना प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून पदनिर्देशित करणेबाबत कळविले आहे.

सबब, **करआकरणी व करसंकलन** विभागाकडील माहिती अधिकार विषयक कामकाज जलदगतीने पार पाडावे व नागरिकांना माहिती शिघ्रतेने उपलब्ध व्हावी या उद्देशासाठी आणि अधिनियमातील तरतूदी या बाबी विचारात घेऊन, मी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या आदेशान्वये करसंकलन विभागीय कार्यालयासाठी सहाय्यक मंडलाधिकारी व मुख्य कार्यालयासाठी प्रशासन अधिकारी यांना यापूर्वी प्रमाणेच जन माहिती अधिकारी म्हणून कायम ठेवणेस व करसंकलन विभागीय कार्यालयासाठी त्या-त्या विभागीय कार्यालयाचे प्रशासन अधिकारी

२...

यांना व करसंकलन मुख्य कार्यालयांसाठी सह, आयुक्त यांना प्रथम अपिलिय अधिकारी म्हणून पदनिर्देशित करणेस मान्यता देत आहे.

संबंधित अधिकारी यांची प्रशासकीय बदली झाल्यास / पद रिक्त असल्यास, बदली झालेल्या किंवा अतिरिक्त पदभार सोपविलेल्या अधिकारी / कर्मचा-यांनी त्या पदास पदनिर्देशित केल्याप्रमाणे कामकाज करावे. कामकाज बदलामुळे किंवा अन्य कारणांमुळे जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे पद रिक्त राहिल्यास विभागप्रमुख, **करआकरणी व करसंकलन** विभाग यांनी माहितीच्या अधिकाराची व्यवस्थित अंमलबजावणी होण्यासाठी उपाययोजना व कार्यवाही आपल्या स्तरावर करावी.

**आयुक्त,**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

प्रति,

विभागप्रमुख / संबंधित अधिकारी,
**करआकरणी व करसंकलन विभाग,** मुख्य कार्यालय
सर्व विभागीय कार्यालय, करसंकलन,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

प्रत,

माहिती व तंत्रज्ञान विभाग.
२/- प्रस्तुत आदेशाच्या अनुषंगाने मनपा वेबपोर्टलवरील माहिती अद्‌ययावत करावी.

**प्रशासन अधिकारी,**
नागरी सुविधा केंद्र,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.